झेरॉक्स प्रत 59

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धाराशिव **P.S.(ठाणे):** आनंदनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0101 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**01/04/2026 22:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 01/04/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 01/04/2026
**Time From (वेळेपासून):** 11:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 01/04/2026 **Time (वेळ):** 22:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 043

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 01/04/2026 22:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अधीक्षक, वेतन विभाग, माध्यमिक शिक्षण,सेन्ट्रल ,बिल्डींग धाराशिव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** -विजय हनुमंत वगरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving Lic... PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रति,प्रतिबंधक विभाग, धाराशिव ,धाराशिव , आनंदनगर,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रति,प्रतिबंधक विभाग, धाराशिव ,धाराशिव , आनंदनगर,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7722011245

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | इमरानखान अहमदपाशा पठाण | | | 1. वेतन विभाग, माध्यमिक शिक्षण, ध,धाराशिव,आनंदनगर, धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 8000 रूपये | 8,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

8,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी विजय हनुमंत वगरे, वय 39 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव मो.क्र.7722011245.
समक्ष पोलीस ठाणे आनंदनगर जिल्हा धाराशिव येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिंनाक 01/04/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे कर्तव्यावर हजर असताना तक्रारदार नामे संतोष बाबुराव पोतदार, वय 54 वर्ष, व्यवसाय - नोकरी, अध्यापकाचार्य, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यापक विद्यालय, धाराशिव रा. सांजा रोड, काका नगर, धाराशिव यांनी समक्ष येऊन सांगितले की, त्यांना त्यांचे वरीष्ठ वेतन श्रेणी फरकाचे बिल काढण्यासाठी लोकसेवक लाच मागत असल्याचे सांगितले. त्यावरुन आम्ही मा.पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांना सदर तक्रारीबाबत कळविले व त्यांचे तोंडी परवानगी घेऊन पुढील लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाहीस सुरुवात केली. त्यावेळी आम्ही मा.विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, धाराशिव जि. धाराशिव यांना दोन शासकीय कर्मचारी/ अधिकारी पंच म्हणुन मिळणे बाबत पत्र दिले. त्यावरुन त्यांनी त्यांचे कार्यालयातील दोन कर्मचारी पंच म्हणुन आमचे कार्यालयात उपलब्ध करुन दिले. त्यांची नावे 1) श्री. सतिश विलास पाटील, वय 50 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद- लिपीक टंकलेखक, राज्य परिवहन महामंडळ, धाराशिव रा. पिंपळी टाकी जवळ, उंबरे कोटा, धाराशिव, 2) श्री. प्रमोद मल्हारी माने, वय 38 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद- लिपीक टंकलेखक, राज्य परिवहन महामंडळ, धाराशिव रा. काकडे प्लॉट, शाहु नगर, धाराशिव असे असल्याचे सांगितले.
दिंनाक 01.04.2026 रोजी पंच हे सकाळी 11:00 वाजता ला.प्र.वि.कार्यालय धाराशिव येथे आले असता त्यांची ओळख करुन घेतली तसेच आमची व सापळा पथकात पोनि/नरवटे, पोहेकॉ/पाटील, पोशि/ तावसकर व पोशि/हजारे यांची ओळख करुन दिली. त्यावेळी पंचासमक्ष तक्रारदार यांनी त्यांचे तक्रार त्यांचे हस्ताक्षरात लिहुन दिली. ती पुढीलप्रमाणे आहे. मी संतोष बाबुराव पोतदार, वय 54 वर्ष, व्यवसाय - नोकरी, अध्यापकाचार्य , श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यापक विद्यालय, धाराशिव रा. सांजा रोड, काका नगर, धाराशिव.
मी सन 2004 मध्ये डी.एड कॉलेजमध्ये शिक्षक म्हणुन भरती झालो आहे. मी सन 2017 मध्ये धाराशिव येथे बदली होवुन आलो व आर.पी., डी.एड कॉलेज धाराशिव येथे सध्या अध्यापकाचार्य म्हणुन काम करीत आहे. मला नियामाप्रमाणे 12 वर्ष सेवा पूर्ण झाल्यामुळे वरिष्ठ वेतन श्रेणी मिळावी म्हणुन मी आमच्या कॉलेज मार्फत प्रस्ताव दिला होता. सदरचा प्रस्ताव पुढे शिक्षण उप संचालक कार्यालय, लातूर येथे पाठविण्यात आला होता. सदरचा प्रस्ताव  शिक्षण उप संचालक  कार्यालय, लातूर येथुन मंजुर होवुन आला व मला मार्च 2024 पासुन वरिष्ठ वेतन श्रेणी मिळण्यास चालु झाली आहे. माझे सन 2016 ते सन 2024 या दरम्यानचे वेतनाचा फरक 1,84,600/- रुपये मिळणे करीता दिंनाक 15.01.2026 रोजी मा. अधीक्षक,  वेतन व भविष्य निंवाह निधी कार्यालय, धाराशिव यांचे नावे आमचे कॉलेज मार्फत फरक बिल प्रस्ताव दिला होता.दिंनाक 31/03/2026 रोजी आमच्या कॉलेजचे प्राचार्य श्री पवार सर यांना अधीक्षक, वेतन व भविष्य निंवाह निधी कार्यालय, धाराशिव येथुन श्री पठाण साहेब यांनी निरोप दिला की, श्री. संतोष पोतदार यांचे वरीष्ठ वेतन श्रेणी मधील फरकाचे बिलामध्ये काही त्रुटी आहे. त्यापूर्ण करण्यासाठी मला पोतदार यांना भेटण्यास सांगा.
त्या निरोपाप्रमाणे मी दिंनाक 31/03/2026 रोजी दुपारी 04:00 वाजता सेंट्रलबिल्डींग, धाराशिव येथील अधीक्षक वेतन व भ.नि.नि. विभाग धाराशिव या कार्यालयात अधीक्षक श्री.पठाण साहेब यांना भेटलो. मी त्यांना म्हणालो की, आमचे प्राचार्य पवार सर यांनी सांगितलेवरुन तुम्हाला भेटण्यासाठी आलो आहे. माझे वरीष्ठ वेतन श्रेणीचे फरकाचे बिल आपले कार्यालयात प्रलंबित आहे असे मी त्यांना म्हणालो , ते मला बसा म्हणाले त्यावरुन मी त्यांचे समोरील खुर्चीवर बसलो.त्यानंतर थोडया वेळाने त्यांनी टेबलाचे ड्रावर मधुन माझे फरकाचे बिलाचे फाईल काढली व त्यांनी मला 1,84,600/- रुपयाचे आपले बिल आहे. मार्च एंड चालु आहे. शासनाने जेवढे बजेट पाठवले



Scanned with OKEN Scanner

62



आहे. त्यामध्ये सर्वाचे बिल काढता येत नाही. मी जवळच्या लोकांचे बिल काढत आहे.थोडावेळ थांबु
कागदावर 10 आकडा लिहून एवढे दया असे म्हणाले त्यावर मी त्यांना दहा हजार रुपये माझ्याकडे आत्ता नाहीत
असे म्हणालो. तेव्हा त्यांनी ATM मधुन काढुन आना सगळेच पर्याय मिच सांगु का? असे ते मला म्हणाले.
बिल आज पाठवतो तुम्ही पैसे घेवुन या असे ते म्हणाले.

त्यावर मी त्यांना नाविलाजास्तव ठिक आहे माझे बिल जमा करा असे म्हणून तेथुन निघुन आलो. त्यानंतर
लक्षात आले की, माझे वरीष्ठ वेतन श्रेणी फरकाचे बिल काढण्यासाठी अधीक्षक वेतन विभाग माध्यमिक शिक्षण
धाराशिव येथील अधीक्षक श्री पठाण साहेब हे मला मागत असलेले 10,000/- रुपये हे कोणतीही शासकीय
नसुन ती लाचच आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही.
अधीक्षक पठाण साहेब व माझ्यामध्ये कोणताही पैसे देण्या- घेण्याचा आर्थिक व्यवहार नाही. तसेच आमच्यात
कोणतीही आप दुष्मनी, भांडण नाही. आज दि.01/04/2026 रोजी मी माझे वरीष्ठ वेतन श्रेणी फरकाचे बिल
काढण्याबाबत अधीक्षक वेतन विभाग माध्यमिक शिक्षण, धाराशिव येथील पठाण साहेब यांना त्यांचे कार्यालयात
जावुन माझे कामाबद्दल बोलणार आहे. त्यावेळी अधीक्षक पठाण साहेब यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन त्यांनी
स्वता: किंवा इतरामार्फत लाच रक्कम स्वीकारल्यास त्याच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विंनती. मी
सोबत बिल मागणी करण्यासाठी आमचे प्राचार्यांचे मार्फतीने दिलेल्या प्रस्तावाची ओसी प्रत सादर करीत आहे.
त्यावरुन दिंनाक 01.04.2026 रोजी लोकसेवक पठाण हे लाच मागणी करतात का? यांची पडताळणी
करण्याकरीता पंच क्र.1 सतिश पाटील व तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर चालुकरुन ते तक्रारदार यांना लावुन
पाठविले असता लोकसेवक पठाण यांनी तक्रारदार यांना त्यांचे वरीष्ठ वेतन श्रेणी फरकाचे बिल काढण्यासाठी
अधीक्षक वेतन विभाग माध्यमिक शिक्षण, धाराशिव येथील अधीक्षक पठाण साहेब यांना भेटले असता पैसे आणले का
त्याबाबत ईशारा केला असता तक्रारदार म्हणाले की, तुम्ही सांगितलेले 10,000/- रुपये जास्त होत आहेत असे
म्हणाले असता आलोसे यांनी तक्रारदार यांना किरकोळ रक्कम आहे तसेच 2,000/-रुपये कमी दया असे म्हणाले
त्यावरुन आलोसे यांनी तडजोडी अंती 8,000/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष करुन लाच रक्कम लवकर घेऊन
या असे  सांगितल्याचे निष्पन्न झाले आहे. तक्रारदार पोतदार यांना लोकसेवक पठाण यांनी लाचेची रक्कम घेवुन या
असे सांगितल्यामुळे सापळा कारवाई आजमावण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आहे.
त्यानंतर पंच क्र.1 सतिश पाटील यांना तक्रारदार पोतदार यांचे सोबत सापळा कारवाई दरम्यान जाण्याच्या व
तक्रारदार यांना इतर उपयुक्त सुचना दिंल्यानतर तक्रारदार यांनी 500/- रुपये दराच्या 16 नोटा असे एकुण
8,000/- रुपये हजर केले. त्यानंतर त्यांना व पंचांना ॲॅथ्रसीन पावडरचे गुणधर्म सांगुण प्रत्याक्षिक करुन
दाखवण्यात आले. त्यानंतर ॲॅथ्रसीन पावडर लावलेली लाच रक्कम 8,000/- रुपये हि तक्रारदार यांचे पॅन्टच्या
उजव्या खिस्यामध्ये ठेवुन त्या उजव्या हाताने लोकसेवक पठाण यांना देवुन त्यांनी जर ते घेतल्या तर डाव्या हाताने
डोळयावरील चष्मा काढण्याच्या सुचक इशारा करावा असे तक्रारदार यांना सांगितले. सुचना दिल्या त्यानंतर पंच क्र.
1 सतिश पाटील यांचे समक्ष तक्रारदार यांचे डाव्या बाजुला बनियनचे आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर चालु करुन
कापडी लहान पिशवीमध्ये ठेवुन काटा पिनने लावण्यात आला पंच क्रमांक 2 प्रमोद माने  यांना आजुबाजुला राहुन
सर्व सापळा करवाईमध्ये होणारे घडामोडीवर लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच सतिश
पाटील यांना आलोसे पठाण यांचेकडे पाठवण्यात आले त्यांचे मागे सापळा कारवाईतील अधिकारी व अंमलदार हे
रवाना झाले. तक्रारदार व पंच हे आलोसे यांचे कार्यालयात गेल्यानंतर ते तेथे न दिसल्यामुळे त्यांनी कार्यालयातील
इतर कर्मचा-यांना पठाण साहेब कुठे गेले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, त्यांचे जिल्हा कोषागार, धाराशिव
येथे काम असल्यामुळे ते जिल्हा कोषागार, धाराशिव येथे गेले आहेत. त्यामुळे तक्रारदार, पंच व सापळा पथक हे
जिल्हा कोषागार, धाराशिव येथे गेले. परंतु पठाण साहेब तिथे न दिसल्यामुळे ते लाचलुचपत प्रतिंबधक विभाग,
धाराशिव येथे परत आले.
त्यानंतर थोडयावेळाने सर्वानुमते तक्रारदार यांना पुन्हा लोकसेवक पठाण यांचे भेटीसाठी पंच क्रमांक 1 सतिश
पाटील यांचे सोबत सापळा कारवाई दरम्यान जाण्याच्या व तक्रारदार व पंच यांना इतर उपयुक्त सुचना दिंल्यानतर
अन्ॅथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम 8,000/- रुपये हि तक्रारदार यांचे पॅन्टच्या उजव्या खिस्यामध्ये ठेवुन
त्या उजव्या हाताने लोकसेवक पठाण यांना देवुन त्यांनी जर ते घेतल्या तर डाव्या हाताने डोळयावरील चष्मा
काढण्याच्या सुचक इशारा करावा असे तक्रारदार यांना सांगितले. सुचना दिल्या त्यानंतर पंच क्रमांक सतिश पाटील
यांचे समक्ष तक्रारदार यांचे डाव्या बाजुला बनियनचे आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर चालु करुन कापडी लहान
पिशवीमध्ये ठेवुन काटा पिनने लावण्यात आला पंच प्रमोद माने यांना आजुबाजुला राहुन सर्व सापळा करवाईमध्ये
होणारे घडामोडीवर लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच सतिश पाटील यांना आलोसे पठाण
यांचेकडे पाठवण्यात आले त्यांचे मागे सापळा कारवाईतील अधिकारी व अंमलदार हे रवाना झाले. तक्रारदार व



Scanned with OKEN Scanner

आलोसे पठाण यांची सेंट्रलबिल्डींग, धाराशिव येथील अधीक्षक वेतन व भ.नि.नि. विभाग धाराशिव या कार्यालयात भेट झाली. तक्रारदार यांना आलोसे यांनी लाच रक्कम 8,000/- रुपये ही त्यांचे टेबलवर असलेल्या डायरीमध्ये ठेवण्यास सांगितले तक्रारदार यांनी लाच रक्कम डायरीमध्ये ठेवल्यानंतर आलोसे यांनी उजव्या हाताने लाच रक्कम उचलुन त्यांचे पॅन्टचे उजव्या बाजुचे पाठीमागील खिशामध्ये ठेवले. त्यानंतर तक्रारदार पोतदार हे कार्यालयाचे बाहेर येऊन त्यांनी डाव्या हाताने त्यांचे डोळ्यावरील चष्मा काढुन त्यांना नेमुन दिलेला इशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने आलोसे पठाण यांना त्यांचे कार्यालयातुन ताब्यात घेऊन त्यांचे पॅन्टचे उजव्या बाजुचे पाठीमागील खिशामधुन 500/- रुपये दराच्या 16 चलनी नोटा अशा एकुण 8,000/- रुपये जप्त करण्यात आल्या. सदर नोटा यांचे नंबर दोन्ही पंच यांनी खात्री करुन घेतले त्यानंतर सदर नोटा हया पंच माने यांचे ताब्यात देण्यात आल्या घटनास्थळावरील सापळा करवाई पूर्णकरुन आम्ही पुढील कारवाई करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे आलो. सदर लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. तरी लोकसेवक इमरानखान अहमदपाशा पठाण वय 40 वर्षे, व्यवसाय नौकरी पद अधीक्षक, वेतन विभाग, माध्यमिक शिक्षण, धाराशिव यांनी तक्रारदार पोतदार यांचे वरीष्ठ वेतन श्रेणी फरकाचे सन 2016 ते सन 2024 या दरम्यानचे वेतनाचा फरक बिल 1,84,600/- रुपये काढण्यासाठी तक्रारदार यांचेकडून 10,000/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 8,000/- रुपये स्विकारल्यामुळे माझी त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, सन- 1988 कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA PANDURANG KHANDEKAR(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

N.C.
I.I.F.-I (एकीकृ

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer In Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे
आनंदनगर,धाराशिव

**Name (नाव):** RAVINDRA PAN
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

Scanned with OKEN Scanner